सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात कृषि यांत्रिकीकरण उप अभियानांतर्गत रु.२०५१०.००६६ लाख किंमतीच्या वार्षिक कृति आराखड्यास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणे तसेच, सदर योजनेकरीता तिन्ही प्रवर्गासाठी (सर्वसाधारण, अनु. जाती, अनु. जमाती.) एकूण रु.१५७६.६६६७ लाख इतका निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक :- कृवपदुम-१९०४५/१५/२०२५-MAG-८A (E- ११०५४२३)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०००३२.
दिनांक : २५ मार्च, २०२६

संदर्भ:-

१. केंद्र शासनाने www.agricoops.nic.in या संकेत स्थळावरील राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या मार्गदर्शक सुचना.
२. कृषि विभाग शासन पत्र क्रमांक CSS २०२५/C.R.१४/२-A दिनांक २६.०३.२०२५
३. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र. ४४/अर्थ-३, दिनांक ०७.०४.२०२५
४. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक विघयो २०२५/प्र.क्र.५८/अर्थसंकल्प दि.१५.०४.२०२५
५. आदिवासी विकास विभाग शासन परिपत्रक बियुडी २०२५/प्र.क्र. २/कार्यासन-६, दि.२१.०४.२०२५
६. कृषि व शेतकरी कल्याण विभाग, केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र, क्रमांक : १-१५/२०२५-RKVY, दिनांक २१.०४.२०२५
७. केंद्र शासनाच्या कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, कृषि व शेतकरी कल्याण विभागाचे पत्र क्र.१-१५/२०२५-RKVY, दिनांक ३०.०४.२०२५
८. कृषि विभाग शासन निर्णय क्रमांक कृवपदुम-१९०४५/१०/२०२५-MAG-८A (E-१०८०७२२) दि.०२.०५.२०२५.
९. कृषि विभाग शासन निर्णय क्रमांक कृवपदुम-१९०४५/१५/२०२५-MAG-८A (E-११०५४२३) दि.०९.०५.२०२५.
१०. कृषि व शेतकरी कल्याण विभाग, केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र, क्रमांक : १-१५/२०२५-RKVY, दिनांक २१.०१.२०२६
११. कृषि विभाग शासन निर्णय क्रमांक कृवपदुम-१९०४५/१५/२०२५-MAG-८A (E-११०५४२३) दि.०९.०२.२०२६
१२. कृषि विभाग शासन निर्णय क्रमांक कृवपदुम-१९०४५/१५/२०२५-MAG-८A (E-११०५४२३) दि.२४.०३.२०२६
१३. कृषि व शेतकरी कल्याण विभाग, केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र, क्रमांक : १-१५/२०२५-RKVY, दिनांक २३.०३.२०२६
१४. संचालक (कृषी अभियांत्रिकी संचालनालय), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र, क्र.कृ.या.उ.अ./गुनि-५/नक्र. २४२/२२२-र/२०२५-२६, दिनांक २३.०३.२०२६

**प्रस्तावना :**

राज्यात केंद्र पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण उप अभियान राबविण्यात येत आहे. सदर उप अभियानांतर्गत एकूण आठ घटक असून घटक क्र. १ व २ हे नवीन तंत्रज्ञानाने विकसित केलेल्या संयंत्रांची प्रात्यक्षिके, प्रशिक्षण व चाचणीबाबत आहेत. घटक क्र. १ व २ यासाठी केंद्र हिश्श्याचे प्रमाण १०० टक्के आहे. उर्वरित ६ घटकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या निधी हिश्श्याचे प्रमाण ६०:४० असे आहे.

राष्ट्रीय कृषि विकास योजना RKVY अंतर्गत कृषि यांत्रिकीकरण उपअभियानासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील SLSC च्या दिनांक २४.०३.२०२५ रोजीच्या बैठकीत मान्यता दिल्याप्रमाणे तसेच केंद्र शासनाच्या प्रकल्प मंजूरी समिती (PAC) ने दिलेल्या मान्यतेनुसार सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र हिस्सा रु.१२२४८.७५ लाख व त्यासाठीचा समरुप राज्य हिस्सा रु.८१६५.८३ लाख याप्रमाणे एकूण रु.२०४१४.५८ लाख निधीच्या वार्षिक कृती आराखडयास संदर्भ क्र. ८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्र. ९, ११ व १२ अन्वये कृषि यांत्रिकीकरण उपअभियानासाठी आतापर्यत रु.१८८३८.३३ लाख इतका निधी वितरीत केला आहे.

केंद्र शासनाने संदर्भ क्र. १३ येथील दिनांक २३ मार्च, २०२६ रोजीच्या पत्रान्वये अतिरिक्त रु.१०.०३ कोटी इतक्या निधीचे Mother Sanction दिले आहे. केंद्र शासनाकडून प्राप्त तिसऱ्या हप्त्याच्या अनुषंगाने कृषि यांत्रिकीकरण उप अभियानाकरिता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी केंद्र हिस्सा रु.१२३०६.०० लाख व त्यास अनुरुप राज्य हिस्सा रु.८२०४.००६६ लाख अशा एकूण रु.२०५१०.००६६ लाख इतक्या निधीच्या कार्यक्रमास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. तसेच केंद्र शासनाने संदर्भ क्र. १३ अन्वये राष्ट्रीय कृषि विकास योजना (RKVY) अंतर्गत कृषि यांत्रिकीकरण उपअभियानासाठी सन २०२५-२६ करिता प्राप्त तिसऱ्या हप्त्यास अनुसरुन सदर योजनेच्या लेखाशिर्षांतर्गत बिम्स प्रणालीवर उपलब्ध अर्थसंकल्पिय तरतूदीच्या मर्यादेत तिसऱ्या हप्त्याचा केंद्र हिश्श्याचा रु.९४६.०० लाख व त्यास अनुरुप राज्य हिस्सा रु.६३०.६६६६७ लाख असा एकूण रु.१५७६.६६६६७ लाख इतका निधी आयुक्त (कृषि) यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यानुषंगाने शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :**

१. राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत कृषि यांत्रिकीकरण उपअभियान योजनेस सन २०२५-२६ मध्ये केंद्र हिस्सा रु.१२३०६.०० लाख व त्यासाठीचा समरुप राज्य हिस्सा रु.८२०४.००६६ लाख याप्रमाणे एकूण रु.२०५११.००६६ लाख निधीच्या वार्षिक कृती आराखडयास खालीलप्रमाणे बाबनिहाय व प्रवर्गनिहाय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**(रुपये लाखात)**

| प्रवर्ग | केंद्र | राज्य | एकूण |
|---|---|---|---|
| **सर्वसाधारण** | ९९१०.०० | ६६०६.६७ | १६५१६.६७ |
| **अनुसूचित जाती** | १३३७.०० | ८९१.३३६६ | २२२८.३३६६ |
| **अनुसूचित जमाती** | १०५९.०० | ७०६.०० | १७६५.०० |
| **एकूण** | १२३०६.०० | ८२०४.००६६ | २०५१०.००६६ |

२. राष्ट्रीय कृषि विकास योजना (RKVY) अंतर्गत कृषि यांत्रिकीकरण उपअभियानासाठी सन २०२५-२६ करिता केंद्र शासनाकडून प्राप्त तिसऱ्या हप्त्यास अनुसरुन सदर योजनेच्या लेखाशिर्षांतर्गत बिम्स प्रणालीवर उपलब्ध अर्थसंकल्पिय तरतूदीच्या मर्यादेत तिसऱ्या हप्त्याचा केंद्र हिश्श्याचा रु.९४६.०० लाख व त्यास अनुरुप राज्य हिस्सा रु.६३०.६६६६७ लाख असा एकूण रु.१५७६.६६६६७ लाख इतका निधी आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे पुढीलप्रमाणे वितरीत करण्यात येत आहे. याबाबत केंद्र व राज्य हिश्श्याचे प्रवर्गनिहाय (सर्वसाधारण, अनु. जाती. अनु. जमाती) निधी वितरण पुढीलप्रमाणे :

| **प्रवर्ग** | **तिसरा हप्ता (रुपये लाखात)** | | |
|---|---|---|---|
| | **केंद्र** | **राज्य** | **एकूण** |
| **सर्वसाधारण** | ७५०.०० | ५००.०० | १२५०.०० |
| **अनु. जाती** | १०९.०० | ७२.६६६६७ | १८१.६६६६७ |
| **अनु. जमाती** | ८७.०० | ५८.०० | १४५.०० |
| **एकूण** | ९४६.०० | ६३०.६६६६७ | १५७६.६६६६७ |

३. सदर योजनेंतर्गत मंजूर केलेला उपरोक्त निधी खालील लेखाशिर्षाखाली चालू वर्षी अर्थसंकल्पित केलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

| प्रवर्ग | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा |
|---|---|---|
| **सर्वसाधारण प्रवर्ग** | मागणी क्रमाक:- डी-३<br>२४०१ पीक संवर्धन,<br>(००)११३-कृषि अभियांत्रिकी<br>(००) (०८) कृषि उन्नती योजना कृषि अभियांत्रिकीकरण उपअभियान (कें.पु.यो),<br>(केंद्र हिस्सा ६० टक्के) (२४०१ २५१३)<br>३३ अर्थसहाय्य | मागणी क्रमाक:- डी-३<br>२४०१ पीक संवर्धन,<br>(००)११३-कृषि अभियांत्रिकी<br>(००) (१६) कृषि उन्नती योजना कृषि अभियांत्रिकीकरण उपअभियान (कें.पु.यो),<br>(राज्य हिस्सा ४० टक्के) (२४०१ ८७३६)<br>३३ अर्थसहाय्य |
| **अनुसूचित जाती** | मागणी क्रमाक : एन-३<br>२४०१ पीक संवर्धन,<br>७८९ अनुसूचित जाती उप योजना<br>(०१) (११) कृषि उन्नती योजना कृषि अभियांत्रिकीकरण उपअभियान (कें.पु.यो),<br>(केंद्र हिस्सा ६० टक्के) (२४०१बी १८८)<br>३३ अर्थसहाय्य | मागणी क्रमाक : एन-३<br>२४०१ पीक संवर्धन,<br>७८९ अनुसूचित जाती उप योजना<br>(०१) (१२) कृषि उन्नती योजना कृषि अभियांत्रिकीकरण उपअभियान (कें.पु.यो),<br>(राज्य हिस्सा ४० टक्के) (२४०१बी १९७)<br>३३ अर्थसहाय्य |
| **अनुसूचित जमाती** | मागणी क्रमाक : टी-५<br>२४०१ पीक संवर्धन,<br>७९६ जनजाती उप योजना<br>(०१) जनजाती क्षेत्र उप योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना,<br>(०१) (११) कृषी उन्न्ती योजना कृषि यांत्रिकीकरण उपअभियान (कें.पु.यो),<br>(केंद्र हिस्सा ६० टक्के) (२४०१ए ४५९),<br>३३ अर्थसहाय्य | मागणी क्रमाक : टी-५<br>२४०१ पीक संवर्धन,<br>७९६ जनजाती उप योजना<br>(०१) जनजाती क्षेत्र उप योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना,<br>(०१) (१०) कृषी उन्न्ती योजना कृषि यांत्रिकीकरण उपअभियान (कें.पु.यो),<br>(राज्य हिस्सा ४० टक्के) (२४०१ए ४४१),<br>३३ अर्थसहाय्य |

४. या उप-अभियानाकरीता वितरीत केलेला निधी केंद्र शासनाने वार्षिक कृति आराखड्यात मंजूर केलेल्या बाबींवर खर्ची टाकावा तसेच, अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांना महा-डीबीटी प्रणालीद्वारे आधारसंलग्न बँक खात्यावर सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीव्दारे जमा करावी.

५. सदर योजनेंतर्गत ट्रॅक्टर या बाबीसाठी अनुसूचित जाती/जमाती, महिला, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांसाठी किंमतीच्या ५०% किंवा रु. १.२५ लाख यापैकी जे कमी असेल ते आणि इतर शेतकऱ्यांसाठी ४०% किंवा रु.१.०० लाख यापैकी जे कमी असेल ते याप्रमाणे अनुदान देण्यात यावे.

६. इतर यंत्र/अवजारांच्या बाबतीत केंद्र शासनाच्या कृषि यांत्रिकीकरण उप अभियानाच्या मार्गदर्शक सूचना, अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

७. सदर निधी खर्च करताना तो विहित कार्यपध्दती अनुसरून सर्व वित्तीय कायदे/प्रक्रियाचे/वित्तीय अधिकारांच्या मर्यादा/C.V.C. तत्वानुसार/ प्रचलित शासन निर्णय/ नियम/ परिपत्रक/ तरतुदीनुसार, बजेट व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अंमलबजावणी यंत्रणांनी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन नियम/ अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कर्यालयाची राहील.

८. कृषि यांत्रिकीकरण उप अभियानाच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी, संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषि आयुक्तालय यांनी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन उदिष्टनिहाय अंमलबजावणी विषयक सविस्तर सूचना सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना निर्गमित कराव्यात. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे या योजनेचा आर्थिक व भौतिक प्रगतीचा मासिक अहवाल प्रत्येक महिन्याच्या ५ तारखे पर्यंत केंद्र शासनास सादर करावा.

९. सदर अभियानाकरिता वितरित केलेला निधी कोषागारातून आहरित करण्याकरिता आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून आणि सहाय्यक संचालक (लेखा-१) कृषी आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय संदर्भाकित क्र. ३ ते ५ येथील अनुक्रमे वित्त विभाग दि.०७.०४.२०२५ चे शासन परिपत्रक, सामाजिक न्याय विभाग दि.१५.०४.२०२५ शासन परिपत्रक व आदिवासी विकास विभागाच्या दि.२१.०४.२०२५ शासन परिपत्रकान्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन व सदर परिपत्रकातील अटी शर्तीची पूर्तता करुन निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०३२५१६२४३१०९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

BHUPESH ARUN KOLI

Digitally signed by BHUPESH ARUN KOLI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=c4831497ab54666fcf0fc384ac56a4a6e7eef3940ffe7ecbeff3b790dc48d7c0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=44C8C2D62EADD87E9FFCCD81C023E722799B7A87A062FC30B0E6A3B49CBA4384, cn=BHUPESH ARUN KOLI
Date: 2026.03.25 16:25:38 +05'30'

**( भुपेश अ. कोळी )**

**कार्यासन अधिकारी ,महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

१. मा. मंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई-३२.

२. मा. राज्यमंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई-३२.
३. अ.मु.स.(वित्त), वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
४. अ.मु.स.(नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
५. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
६. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व संचालक/सह संचालक, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
८. विभागीय कृषि सह संचालक (सर्व).
९. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व).
१०. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर (लेखा परिक्षा) /(लेखा व अनुज्ञेयता).
११. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. सह सचिव/उप सचिव/ अवर सचिव/कार्यासन अधिकारी (सर्व) (कृषि) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
१३. वित्त विभाग (का. व्यय-१/अर्थसंकल्प-१३), मंत्रालय,मुंबई
१४. नियोजन विभाग (कार्या-१४३१), मंत्रालय,मुंबई
१५. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (का- अर्थ विघयो), मंत्रालय, मुंबई
१६. आदिवासी विकास विभाग (कार्यासन-६), मंत्रालय,मुंबई
१७. निवडनस्ती ८-अे